बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

निगमित संप्रेषण व निवेशक संबंध

प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5

टेलि - 020 25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 495

**प्रसिद्धीसाठी**

## बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये “सतर्कता जागरूकता सप्ताह” संपन्न

पुणे 27 ऑक्टोबर, 2020 : देशातील अग्रगण्य बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये “सतर्कता जागरूकता सप्ताह” ची सुरुवात झाली. दिनांक 27 ऑक्टोबर ते 2 नोव्हेंबर 2020 या कालावधीत बँकेची सर्व कार्यालये आणि शाखा यामध्ये हा सप्ताह संपन्न होईल. केंद्रीय सतर्कता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सतर्कता जागरूकता सप्ताह साजरा केला जातो.

समारंभाच्या प्रारंभी बँकेच्या सर्व कर्मचा-यांना श्री ए.एस.राजीव, व्यवस्थापकीय संचालक व प्रमुख कार्यकारी अधिकारी यांनी “सचोटीची शपथ” व्हिडिओ कॉन्फरन्सिंग पद्धतीने दिली. या वेळी बँकेचे कार्यकारी संचालक श्री हेमंत टम्टा व श्री नागेश्वर राव वाय. तसेच बँकेचे सर्व महाप्रबंधक उपस्थित होते. या प्रसंगी राष्ट्रपती, उप राष्ट्रपती, प्रधानमंत्री, केंद्रीय दक्षता आयोग आणि इतर मान्यवरांकडून आलेले संदेश वाचून दाखवण्यात आले. श्री राजीव, व्यवस्थापकीय संचालक व प्रमुख कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते बँकेने जनहितासाठी केलेल्या “अवैध आणि फसवणूकीच्या बँकिंग पद्धतींबद्धल जागरुकता व्हिडिओ” प्रकाशित करण्यात आला.

श्री हेमंत टम्टा, कार्यकारी संचालक यांनी आपल्या प्रमुख भाषणात “प्रतिबंधात्मक सतर्कता उपक्रम” दर्शित केले. श्री एल.एन.रथ, प्रमुख सतर्कता अधिकारी यांनी आपल्या समारोपाच्या भाषणात केंद्रीय सतर्कता आयोगाच्या सूचनांनुसार अंतर्गत प्रणाली/ कार्यपद्धती यांवर भर दिला. त्यांनी बँकेच्या सर्व प्रादेशिक विभागांना बँकेच्या कामकाजात गुणात्मक सुधारणा होण्यासाठी सुचवलेल्या योजनांची सक्रिय कार्यवाही करण्याचे आवाहन केले.

श्रीमती मृदुल जोगळेकर, उप सरव्यवस्थापक (दक्षता) यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. “सतर्कता जागरूकता सप्ताहा” चा समारोह समारंभ बँकेच्या मुख्य कार्यालयात दिनांक 2 नोव्हेंबर, 2020 रोजी आयोजित केला जाणार आहे.